<u>महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण,२००१</u>
महाराष्ट्र स्पोर्टस् इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट
<u>प्लॅन अंतर्गत क्रीडा सुविधा निर्माण करणे</u>

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक- राक्रीधो २००४/प्र.क्र.११०/क्रीयुसे १
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ७ डिसेंबर २००५

वाचा: १) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक- राक्रीधो २००३/प्र.क्र.११/क्रीयुसे १, दिनांक २८ मार्च, २००३
२) क्रीडा व युवकसेवा संचालनालयाचे पत्र क्रमांक- राक्रीधो/२००४/१८८/का-९, दिनांक १.३.२००५
३) क्रीडा व युवकसेवा संचालनालयाचे पत्र क्रमांक - राक्रीविस/०५-०६/२०९/का-९, दिनांक २७.६.२००५

<u>शासन निर्णय :-</u> दिनांक २६.३.२००३ च्या शासन निर्णयान्वये राज्यशासनाने राज्यात महाराष्ट्र स्पोर्टस, इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन अंतर्गत क्रीडा सुविधा निर्माण करण्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. त्या आदेशातील तरतूदीनुसार राज्यात प्रत्येक तालुक्यात तालुका क्रीडा संकुल, जिल्ह्यात जिल्हा क्रीडा संकुल व विभाग स्तरावर विभागीय क्रीडा संकुल उभारण्याचे मान्य करण्यात आले आहे. यासाठी शासनाकडून संकुल समित्यांची निर्मिती करणे आणि संकुलासाठी निधी मुक्त करणे इत्यादी बाबींचासमावेश आहे. परंतु हे सर्व करीत असताना संकुल समित्यांचे कामकाज कशाप्रकारे चालविण्यात यावे, निधी मुक्त करण्याच्या पद्धतीचे निकष काय असावेत, क्रीडा संकुलातील सोयी-सुविधांची देखभाल कशाप्रकारे करण्यात यावी व संकुलाची निर्मिती वाणिज्यीक प्रयोजनासाठी करावयाची झाल्यास यासाठी निश्चित अशी मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आली नाहीत. ती स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत असल्याचे शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले होते. त्यानुसार आता सोबत जोडलेल्या परिशिष्टान्वये खालील मार्गदर्शक तत्वे व निकष निश्चित करण्यात येत आहेत :-

१) क्रीडा संकुल समित्यांच्या कामकाजाबाबत मार्गदर्शक तत्वे सोबत परिशिष्ट "अ"मध्ये दर्शविण्यात आली आहेत.

२) विभागीय व जिल्हा क्रीडा संकुल यांना निधी मुक्त करण्याच्या पद्धतीचे निकष सोबत परिशिष्ट "ब"मध्ये दर्शविण्यात आली आहेत.

३) क्रीडा संकुलातील इन-डोअर-हॉल व साहित्य सामुग्रीची देखभाल करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे सोबत परिशिष्ट "क"मध्ये दर्शविण्यात आली आहेत.

४) क्रीडा संकुलाची निर्मिती वाणिज्यीक प्रयोजन अथवा गुंतवणीकीद्वारा प्रकल्प हाती घेत असल्यास, महाराष्ट्र स्पोर्टस् इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट सपोर्ट अॅक्ट यांच्या तरतूदीस अधिन राहून प्रकल्प हाती घेण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे सोबत परिशिष्ट "ड"मध्ये दर्शविण्यात आली आहेत.

२. सोबतच्या मार्गदर्शक तत्वांची व निकषांची राज्यामध्ये क्रीडा प्रकल्प राबवितांना काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( सु. द. चव्हाण )
अपर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त ( महसूल ),
सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा संकुल कार्यकारी समिती ( संचालनालयामार्फत )
प्रांत अधिकारी, तथा अध्यक्ष, तालुका क्रीडा संकुल कार्यकारी समिती ( संचालनालयामार्फत )
संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
सर्व विभागीय क्रीडा उपसंचालक,( क्रीडा संचालनालयामार्फत )
सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी ( क्रीडा संचालनालयामार्फत )
सर्व तालुका क्रीडा अधिकारी, ( क्रीडा संचालनालयामार्फत )
महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई ( लेखा व अनुज्ञेयता )
महालेखपाल, महाराष्ट्र २, नागपूर ( लेखा आणि अनुज्ञेयता )
सर्व जिल्हा कोषाधिकारी, ( क्रीडा संचालनालयामार्फत )
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
महसूल व वन विभाग/नियोजन विभाग/वित्त विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग/ग्राम विकास व जलसंधारण विभाग/नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई,
सर्व महापालिका आयुक्त/सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद ( क्रीडा संचालनालयामार्फत )
मा.मंत्री ( शा.शि. व क्रीडा )यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री ( क्रीडा )यांचे खाजगी सचिव
सचिव ( शा.शि. व क्री. ) यांचे स्वीय सहाय्यक
निवड नस्ती-क्रीयुसे १

## विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समित्यांच्या कामकाजाबाबत मार्गदर्शक तत्वे

### परिशिष्ट "अ"

१. विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल कार्यकारी समितीची स्थापना करून, समितीची नोंदणी सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० व मुंबई पब्लीक ट्रस्ट ॲक्ट, १९५० नुसार करून घेणे.

२. विभागीय/ जिल्हा क्रीडा संकुल समितीने विभागाच्या/ जिल्हयाच्या क्रीडा संकुलासाठी आवश्यक ती शासकिय जमीन महसूल विभागाकडून प्राप्त करून, क्रीडा विभागाच्या ताब्यात घेणे. याशिवाय स्वायत्त स्थानिक संस्था यांच्याकडून मोकळी जमीन अथवा सोई सुविधांसह स्टेडियम उपलब्ध होत असल्यास त्या जमीनीवर क्रीडा संकुल उभारण्याचे ठरल्यास त्या संस्थेबरोबर योग्य तो करारनामा करून घणे.

३. शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने अंदाजपत्रक प्रशासकीय व तांत्रिक आराखडे तयार करण्याकरिता वास्तुशास्त्रज्ञाची नेमणुक करणे, त्यासाठी शासनाच्या वतीने करारनामा करणे.

४. अंदाजपत्रक व आराखडे राज्य क्रीडा विकास समितीच्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेस्तव सादर करणे.

५. विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या अध्यक्षांनी अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधींनी राज्य क्रीडा विकास समितीच्या बेठकीस उपस्थित राहणे.

६. विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल बांधकामाच्या अनुषंगाने निविदा प्रसिध्द करणे, व त्या अंतिम करणे.

७. विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल कार्यकारी समितीच्या बैठकांमध्ये बांधकामाचा आढावा घेणे.

८. विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल बांधकामाकरिता शासनाची अनुदान मर्यादा विचारात घेऊन, अनुदान मागणी प्रस्ताव सादर करणे.

९. शासनाचे उर्वरित अनुदान प्राप्त होण्याकरिता विनियोग प्रमाणपत्र, परिक्षित लेखाविवरणपत्र सादर करण्याबाबत कार्यवाही करणे.

१०. विभागीय/जिल्हा क्रीडा संकुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्याच्या देखभाल व व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडणे. त्याकरिता आवश्यक तो कर्मचारी वर्ग तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर/करार पध्दतीवर नियुक्त करणे. नियुक्त केलेल्या आवश्यक कर्मचा-यांच्या मानधनाचा खर्च समितीस मिळणा-या उत्पन्नातून भागविणे.

११. विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समितीची आढावा बेठक तीन महिन्यातून एकदा अथवा समितीच्या अध्यक्षांच्या निदेशानुसार घेण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल शासनास पाठवावा. मात्र विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल बांधकामाचा मासिक प्रगती अहवाल नियमितपणे क्रीडा व युवकसेवा संचालक, यांच्याकडे सादर करावा.

१२. विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समित्यांनी विभागीय/जिल्हा क्रीडा संकुलाच्या वापराबाबत पुढील मार्गदर्शक तत्वांचा वापर करावा.

## विभागीय/जिल्हा क्रीडा संकुलाच्या वापराबाबत मार्गदर्शक तत्वे

१. क्रीडा संकुलामध्ये सर्वसामान्य विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश असावा.

२. क्रीडा संकुलाच्या मैदानाचा वापर पहिली ते आठवी च्या विद्यार्थ्यांकरिता मोफत ठेवण्यात यावा.

३. क्रीडा संकुलाच्या वापरासाठी आठवीच्या विद्यार्थ्यांकरिता किमान मासिक शुल्क आकारण्यात यावे.

४. शाळा व महाविद्यालये शैक्षणिक व इतर पंजीबध्द क्रीडा संस्था/संघटना यांना मैदान वापरासाठी वार्षिक सदस्याचे शुल्क आकारुन देण्यात यावे. त्यांना मोफत कुठलीही सुविधा उपलब्ध करुन देण्यात येऊ नये.

५. वार्षिक खेळ, वार्षिक कार्यक्रम याकरिता शुल्क आकारण्यात यावे.

६. प्रत्येक इनडोअर खेळाच्या सुविधेकरिता योग्य ते शुल्क आकारण्यात यावे. मात्र असे शुल्क ठरविताना प्रत्येक खेळाच्या संघटनेच्या प्रतिनिधींसमवेत चर्चा करुन कार्यकारी समितीने निर्णय घ्यावा.

७. कार्यकारी समितीने खेळांच्या सुविधेचे वेळापत्रक, वर्षभरातील स्पर्धांचे/प्रशिक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रक तयार करावे.

८. क्रीडा व्यतीरिक्त शासन विहित करील एवढ्या दिवसाकरिता मैदाने व अल्प जागेचा वापर वाणिज्यिक प्रयोजनासाठी करण्यास शासनातर्फे परवानगी देण्यात येईल मात्र ज्या प्रयोजनासाठी जागेचा वापर केला जाणार आहे त्याबाबतच्या सविस्तर तपशिलासह जरुर तो प्रस्ताव संचालनालयामार्फत राज्य शासनाकडे सादर करणे बंधनकारक राहिल.

९. क्रीडा संकुलातील जागेचा अथवा क्रीडा सुविधांचा वापर राजकीय अथवा धार्मिक उपक्रमांसाठी करण्यात येऊ नये.

१०. इनडोअर हॉल व साहित्य सामुग्रीची देखभाल करण्याची जबाबदारी संबंधित समितीची राहील.

११ क्रीडा सुविधामधील ज्या सुविधांचा वापर करिता असताना खेळाडूस जिवित हानीचा धोका असेल त्या ठिकाणी जीवरक्षकाची सेवा उपलब्ध करुन देण्यात यावी.

## विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल यांना निधी मुक्त करण्याच्या पध्दतीचे निकष

### परिशिष्ट "ब"

१. विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल बांधकामाच्या अंदाजपत्रक व आराखडयास मा. क्रीडामंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील राज्य क्रीडा विकास समितीने मान्यता देऊन, निधी मान्य केल्याशिवाय निधी मुक्त करण्यात येऊ नये.

२. राज्य क्रीडा विकास समितीस नियोजन व वित्त विभागाचे प्रशासकिय व वित्तीय अधिकार शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र. राक्रीधो-२००३/प्र.क्र.११/क्रीयुसे-१ दि.२६ मार्च,२००३ अन्वये प्रदान करण्यात आल्याने निधी मुक्त करण्याबाबत शासनाच्या प्रशासकिय विभागाचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता नाही.

३. राज्य क्रीडा विकास समितीने मान्यता दिलेला निधी संबंधित विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समित्यांना मुक्त करण्याचे अधिकार संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील.

४. राज्य क्रीडा विकास समितीने मान्यता दिलेला निधी संबंधित विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समित्यांना मुक्त करण्यापूर्वी, संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आवश्यक ती सर्व कागदपत्रे प्राप्त झाली आहेत याची खात्री करावी.

## विभागीय/जिल्हा क्रीडा संकुलातील इनडोअर हॉल व साहित्य सामुग्रीची देखभाल करण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे. परिशिष्ट "क"

**अ) इनडोअर हॉल देखभालीबाबत :-**

१. इनडोअर हॉल बांधकाम सुविधेचा लाभ घेऊ इच्छिणा-या लाभार्थींकडून मासिक अथवा वार्षिक शुल्क वसूल करण्यात यावे. हे शुल्क किती असावे याबाबत समितीने कार्यकारी समितीच्या बैठकीत निर्णय घ्यावा. मात्र हे शुल्क सर्व सामान्यांना परवडण्यासारखे असेल याबाबत दक्षता घ्यावी.

२. सभासद नोंदणी रजिस्टर ठेवावे. त्यामध्ये उपस्थिती व जमा शुल्काची नोंद असावी.

३. शुल्कापोटी जमा होणारी राशी समितीने आवश्यक त्या देखभालीवर खर्च करावी. मात्र असा खर्च करण्यापूर्वी समितीने कार्यकारी समितीच्या बैठकीत निर्णय घ्यावा.

४. इनडोअर हॉलच्या दैनंदिन साफसफाईसाठी कर्मचा-याची नियुक्ती करणे, लाभार्थींची नोंदणी व शुल्क जमा करण्यासाठी कर्मचारी नियुक्त करावा. या कर्मचा-यांच्या मानधनाचा खर्च समितीने वहन करावा.

५. इनडोअर हॉलच्या दैनंदिन वापरासंबंधी विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समितीने नियमावली तयार करावी व या नियमावलीस क्रीडा व युवकसेवा संचालनालयाची मान्यता घ्यावी.

**ब) जलतरण तलाव देखभालीबाबत :-**

१. जलतरण तलाव बांधकाम सुविधेचा लाभ घेऊ इच्छिणा-या लाभार्थींकडून मासिक अथवा वार्षिक शुल्क वसूल करण्यात यावे. हे शुल्क किती असावे याबाबत समितीने कार्यकारी समितीच्या बैठकीत निर्णय घ्यावा. मात्र हे शुल्क सर्व सामान्यांना परवडण्यासारखे असेल याबाबत दक्षता घ्यावी.

२. सभासद नोंदणी रजिस्टर ठेवावे. त्यामध्ये उपस्थिती व जमा शुल्काची नोंद असावी.

३. शुल्कापोटी जमा होणारी राशी समितीने आवश्यक त्या देखभालीवर खर्च करावी. मात्र असा खर्च करण्यापूर्वी समितीने कार्यकारी समितीच्या बैठकीत निर्णय घ्यावा.

४. जलतरण तलावाच्या दैनंदिन साफसफाईसाठी कर्मचा-याची नियुक्ती करणे, लाभार्थींची नोंदणी व शुल्क जमा करण्यासाठी कर्मचारी नियुक्त करावा. या कर्मचा-यांच्या मानधनाचा खर्च समितीने वहन करावा.

५. जलतरण तलावाच्या दैनंदिन वापरासंबंधी विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समितीने नियमावली तयार करावी व या नियमावलीस क्रीडा व युवकसेवा संचालनालयाची मान्यता घ्यावी.

[illegible]

क) **वसतीगृह देखभालीबाबत :-**

१ वसतीगृह बांधकाम सुविधेचा लाभ घेऊ इच्छिणा-या लाभार्थीकडून मासिक अथवा वार्षिक शुल्क वसूल करण्यात यावे. हे शुल्क किती असावे याबाबत समितीने कार्यकारी समितीच्या बैठकीत निर्णय घ्यावा. मात्र हे शुल्क सर्व सामान्यांना परवडण्यासारखे असेल याबाबत दक्षता घ्यावी.

२ सभासद नोंदणी रजिस्टर ठेवावे. त्यामध्ये उपस्थिती व जमा शुल्काची नोंद असावी.

३ शुल्कापोटी जमा होणारी राशी समितीने आवश्यक त्या देखभालीवर खर्च करावी. मात्र असा खर्च करण्यापूर्वी समितीने कार्यकारी समितीच्या बैठकीत निर्णय घ्यावा.

४ वसतीगृहाच्या दैनंदिन साफसफाईसाठी कर्मचा-याची नियुक्ती करणे, लाभार्थींची नोदणी व शुल्क जमा करण्यासाठी कर्मचारी नियुक्त करावा. या कर्मचा-यांच्या मानधनाचा खर्च समितीने वहन करावा.

५ वसतीगृहाच्या दैनंदिन वापरासंबंधी विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समितीने नियमावली तयार करावी व या नियमावलीस क्रीडा व युवकसेवा संचालनालयाची मान्यता घ्यावी.

ड) **विविध खेळांच्या क्रीडांगणाच्या देखभालीबाबत :-**

१ विविध खेळांच्या क्रीडांगणाच्या सुविधेचा लाभ घेऊ इच्छिणा-या लाभार्थीकडून मासिक अथवा वार्षिक शुल्क वसूल करण्यात यावे. हे शुल्क किती असावे याबाबत समितीने कार्यकारी समितीच्या बैठकीत निर्णय घ्यावा. मात्र हे शुल्क सर्व सामान्यांना परवडण्यासारखे असेल याबाबत दक्षता घ्यावी.

२ सभासद नोंदणी रजिस्टर ठेवावे. त्यामध्ये उपस्थिती व जमा शुल्काची नोंद असावी.

३ शुल्कापोटी जमा होणारी राशी समितीने आवश्यक त्या देखभालीवर खर्च करावी. मात्र असा खर्च करण्यापूर्वी समितीने कार्यकारी समितीच्या बैठकीत निर्णय घ्यावा.

४ विविध खेळांच्या क्रीडांगणाच्या दैनंदिन साफसफाईसाठी कर्मचा-याची नियुक्ती करणे, लाभार्थींची नोदणी व शुल्क जमा करण्यासाठी कर्मचारी नियुक्त करावा. या कर्मचा-यांच्या मानधनाचा खर्च समितीने वहन करावा.

५ विविध खेळांच्या क्रीडांगणाच्या दैनंदिन वापरासंबंधी विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समितीने नियमावली तयार करावी व या नियमावलीस क्रीडा व युवकसेवा संचालनालयाची मान्यता घ्यावी.

इ) साहित्य देखभालीबाबत:-

१. विभागीय/जिल्हा क्रीडा संकुलामध्ये उपलब्ध असणा-या व नव्याने उपलब्ध होणा-या सर्व साहित्याची नोंद जडवस्तू संग्रह नोंदवहीत घेण्यात यावी.

२. नष्ट करावयाच्या साहित्याची यादी कारणांसह व पध्दतीसह क्रीडा व युवकसेवा संचालनालयास सादर करावी. संचालनालयाची मान्यता मिळाल्यानंतर साहित्य नष्ट करण्याबाबत कार्यवाही करावी.

३. सर्व साहित्याच्या दैनंदिन वापरासंबंधी विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समितीने नियमावली तयार करावी व या नियमावलीस क्रीडा व युवकसेवा संचालनालयाची मान्यता घ्यावी.

## क्रीडा संकुलाची निर्मिती वाणिज्यीक प्रयोजन अथवा गुंतवणूकीव्दारा प्रकल्प हाती घेत असल्यास महाराष्ट्र इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट सपोर्ट यांच्या तरतूदीस अधीन राहून प्रकल्प हाती घेण्यासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे परिशिष्ट "ड"

१. महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण, २००१ अंतर्गत क्रीडा संकुलाकरिता उपलब्ध करून देण्यात येणा-या जमिनीचा वापर वाणिज्यीक प्रयोजनासाठी करण्याबाबत शासन निर्णय शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र. राक्रीधो-२००३/प्र.क्र.११/क्रीयुसे-१ दि. २४ फेब्रूवारी.२००३ अन्वये शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील अटी, शर्ती व सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट 'अ' मधील मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित विभागीय/ जिल्हा क्रीडा संकुल कार्यकारी समितीची राहिल.

२. विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल कार्यकारी समितीने प्रकल्प अहवाल तयार करून, संचालक क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सादर करावा. संचालक क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर प्रस्तावास राज्य क्रीडा विकास समितीची मान्यता घेऊन त्याप्रमाणे अंतिम निर्णय संबंधित विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समितीस कळविल्याशिवाय संबंधित विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समितीने अशा प्रकारचे प्रकल्प सुरू करू नयेत.

३. अशा प्रकारच्या प्रकल्प कालावधीमध्ये क्रीडा संकुलाचे व त्याअंतर्गत असलेल्या सर्व सुविधांचे व्यवस्थापन आणि देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

४. संदर्भांकित शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती नमूद करून त्या विकासकास मान्य असल्याबाबतचे लेखी संमतीपत्र संबंधित विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समितीने प्राप्त करून घेऊन संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सादर करावे लागेल.

५. कंत्राटदाराचा कालावधी समाप्त झाल्याबरोबर अशा प्रकारच्या प्रकल्पापासून मिळणारे उत्पन्न संबंधित विभागीय/जिल्हा क्रीडा संकुल समितीकडे जमा करण्यात येणार असल्याने [illegible] अशा प्रकारे मिळणा-या उत्पन्नाचा स्वतंत्रपणे हिशोब ठेवावा.